# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** पिशोर **Year (वर्ष):** 2021
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0035 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/01/2021 21:22 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** बुधवार — **Date From (दिनांक पासून):** 27/01/2021
   **Time Period (कालावधी):** पहर 4 — **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/01/2021
   **Time From (वेळेपासून):** 11:37 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 11:37 बजे

   **(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 27/01/2021 **Time (वेळ):** 21:08 बजे

   **(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 028 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/01/2021 21:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 25 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**
   **(b) Address (पत्ता):** चिंचोली लिं ,कन्नड

   **(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   **(a) Name (नाव):** राजधर साळुबा रोडे
   **(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
   **(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1959 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   **(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   **(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   **(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   **(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वडोद विठ्ठलाचे पोस्ट घाटशेंद्र,कन्नड,पिशोर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वडोद विठ्ठलाचे पोस्ट घाटशेंद्र,कन्नड,पिशोर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भगवान कौतीकराव मगर | | | 1. सोनारगल्ली चिंचोली लिं ,ता कन्नड जि औरंगाबाद,पिशोर,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याददिनांक 27/01/2021मी राजधर साळुबा रोडे, वय 62 वर्षे, व्यवसाय शेती, रा. वडोद विठ्ठलाचे पोस्ट घाटशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद मो. क्र. 9423223694.समक्ष फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन नमुद पत्त्यावर माझे कुटुंबासह रहात असुन शेती व्यवसाय करतो. माझे नावे वडोद शिवारात गट नं. 198 मध्ये 55 आर शेत जमीन असुन त्यामध्ये आम्ही सामाजिक वनिकरण विभाग, कन्नड यांच्या मार्फतीने महोगणी वृक्ष लागवड करण्यासाठी फाईल दाखल केली होती. त्यामध्ये मी माझ्या वरील शेत जमीनीमध्ये 500 महोगणी झाडाची लागवड करण्यासाठी मागणी केली होती. त्याप्रमाणे मला सामाजिक वनिकरण विभाग, कन्नड यांचेकडुन 250 महोगणी झाडांची लागवड करण्याची परवानगी मिळाली. त्यासाठी शेतकऱ्यांना वन विभागाकडुन अनुदान स्वरुपात काही रक्कम मिळते त्यासाठी महोगणी रोपे व खताची खेरदी करावी लागते. त्यानंतर शेतकऱ्यांना त्याचे अनुदान मिळते. त्यासाठी आम्ही आमचे वडोद शिवारात गट न. 198 मध्ये 55 आर शेत जमीनीमध्ये महोगणी वृक्षाची लागवड केलेली आहे. त्यादरम्यान वेळो-वेळी सामाजिक वनिकरण विभाग, कन्नड येथील श्री. मगर साहेब हे वेळो-वेळी आमच्या शेतात येत होते. त्यांनी आमच्या शेतातील महोगणी वृक्षाची लागवड पाहीलेली असुन त्यासाठी आम्हास मिळणाऱ्या अनुदानासाठी मी त्यांना वेळो-वेळी जाऊन भेटलो होतो. मी महोगणी वृक्ष लागवडीसाठी केलेला खर्च अंदाजे 18,000/- रुपये व त्यावरील अनुदान मला मिळण्यासाठी मी श्री. मगर साहेब, वनपाल अधिकारी यांना दिनांक 25/01/2021 रोजी कन्नड येथील त्यांचे सामाजिक वनिकरण विभागाच्या कार्यालयात भेटलो होतो. त्यावेळी त्यांनी मला दि. 27/01/2021 रोजी सकाळी 11.00 वाजे दरम्यान चिंचोली लिंबाजी येथे येवुन भेटा व तेथे येवुन तुमचे महोगणी वृक्ष लागवडीची बीले व त्यासोबतचे कागदपत्रे घेवुन या व त्यासोबत दोन हजार रुपये घेवुन या असे त्यांनी मला सांगीतले होते. परंतु मी जर श्री. मगर साहेब, वनपाल अधिकारी यांना जर पैसे दिले नाही तर श्री. मगर साहेब माझे शेतामध्ये महोगणी वृक्ष लागवडीसाठी केलल्या खर्चाचे बील व अनुदानाचे बील मला मंजुर करुन देणार नाहीत. म्हणुन मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन आलो. मला श्री. मगर साहेब, वनपाल अधिकारी कन्नड यांना पैसे देण्याची इच्छा नाही तसेच श्री. मगर साहेब यांच्याशी माझी काही वैर अगर दुश्मनी नाही किंवा माझा त्यांचे सोबत कोणताही देण्या-घेण्याचा व्यवहार नाही. मला आज दिनांक 27/01/2021 रोजी श्री. मगर साहेब, वनपाल अधिकारी हे चिंचोली लिंबाजी येथे भेटणार आहेत. श्री. मगर साहेब किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी माझ्याकडे माझे महोगणी वृक्ष लागवडीसाठी केलल्या खर्चाचे व अनुदानाचे बील मंजुर करुन देण्यासाठी लाचेची मागणी करुन लाच स्विकारली तर त्यांचे विरुध्द योग्य ती कायदेशिर करवाई करावी हि विनंती. वगैरे मजकुराची तक्रार आहे.सदर तक्रारीचे अनुषंगाने महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांना मला त्यांचे सोबत असलेल्या ईसमांची पंच क्र. 1) श्री. दिपक हिरालाल खरे, वय - 52 वर्षे, व्यवसाय-नोकरी, वरीष्ठ लिपीक, प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद रा. घर नं. 5/3/63 आशुर खाना जवळ जुना उस्मानपुरा, औरंगाबाद व पंच क्र. 2) श्री. सुरेश काशीनाथ थोरात, वय - 44 वर्षे, व्यवसाय नोकरी प्रयोगशाळा तंत्रज्ञ, शासकिय दंत महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद रा. प्लट नं. 101 ए गट नं. 176 ठाकरे

नगर, सातार परिसर, औरंगाबाद अशांचा परिचय करुन दिला. त्यानंतर मी माझी तक्रार दोन पंचासमक्ष महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांना तोंडी सांगीतली. ती त्यांनी लपटपवर तयार करुन त्याची प्रिंट काढली. सदर तक्रारीवर मी तसेच महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशीव दोन पंचांनी सहया केल्या त्यानंतर महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांनी माझ्या व दोन्ही पंचाच्या संमतीने प्रस्तुत प्रकरणात पंचा समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन सदर कारवाई दरम्यान व्हईस रेकर्डरचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगीतले. तसेच एक सोनी कंपनीचा व्हईस रेकर्डर त्यांचेकडील बगमधून काढुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवीले. तसेच सदर व्हईस रेकर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये संभाषण रेकर्डींग होत असल्याचे सांगुन त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकले. तसेच सदर मेमरी कार्ड मध्ये अगोदरचे कोणतेही संभाषण नसल्याची माझी व दोन्ही पंचाना खात्री करुन देण्यात आली. त्यानंतर महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईस अनुसरुन आवश्यक त्या सुचना मला, पंच श्री. दिपक खरे व सुरेश थोरात व सापळा पथकातील कर्मचारी यांना दिल्या. त्यानंतर सापळा पथकातील कर्मचारी श्री. राठोड यांनी त्यांचेकडील व्हईस रेकर्डर सुरु करुन माझे अंगावर कोणास दिसणार नाही अशा स्थितीत ठेवले. त्यांनतर मी व पंच क्र. 01 श्री. दिपक खरे असे माझ्या कडील मोटार सायकलने सुरक्षित ठिकाणाहून दुपारी 10.35 वा. च्या सुमारास निघून चिंचोली लिंबाजी येथील माझ्या खंडोबा मंदिर येथे आलो. थोडयाच वेळात श्री. मगर साहेब, वनपाल अधिकारी तेथे आले. त्यानंतर माझी श्री. मगर साहेब, वनपाल अधिकारी यांच्याशी माझ्या कामासंबंधी बोलणे झाले. तेव्हा श्री. मगर साहेब, वनपाल अधिकारी यांनी दोन हजार रुपये देऊन टाका असे सांगीतले तेव्हा मी त्यांना मी गरीब माणुस आहे. एवढे दोन हजार रुपये कुठुन द्यायचे तुम्हाला त्यानंतर श्री. मगर यांनी तडजोड अंती एक हजार रुपये द्या असे म्हणाल्याने मी त्यांना सांगीतले कि तुम्ही इथेच थांबा मी थोड्या वेळात तायडे मामा यांच्याकडुन पैसे घेवुन आणुन देतो. असे म्हणुन तेथुन निघुन शासकिय वाहन थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी 10.46 वा. च्या सुमारास परत3 | Page आलो. तेथे पोना श्री. राठोड यांनी माझे अंगावर लपवून ठेवलेले व्हईस रेकर्डर काढुन घेवुन बंद केला. त्यानंतर सदर व्हाईस रेकर्डरमध्ये रेकर्ड झालेले संभाषण मी तसेच महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी व दोन्ही पंचांनी ऐकले. त्यामध्ये श्री. मगर, वनपाल अधिकारी यांनी लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांनी माझ्या व पंचांच्या संमतीने सदर प्रकरणी सापळा लावण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांच्या सुचनेवरुन मी माझ्या अंगावरील सर्व साहित्य शासकिय वाहनाचे सिटवर काढुन ठेवले. त्यामधील लाचेच्या रक्कमे करीता आवश्यक असणाऱ्या पाचशे रुपये दराच्या 02 चलनी नोटा असे एकुण 1,000/- रुपये त्यांनी काढुन घेवुन उर्वरीत साहित्य व रोख रक्कम मला परत केली. त्यानंतर ऍ्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले व सापळा कारवाईसाठी आवश्यक त्या सुचना दिल्या. तसेच श्री. मगर, वनपाल अधिकारी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर डोक्याला बांधलेला रुमाल डाव्या हाताने सोडून हातात घेवून लाचेची रक्कम स्विकारल्या बाबत इशारा करण्याची सुचना दिली. सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या ऍ्थ्रासीन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या शर्टाच्या उजव्या खिशात ठेवुन व्हईस रेकर्डर माझे अंगावर कोणास दिसणार नाही अशा अवस्थेत ठेवले. त्यानंतर महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांनी दिलेल्या सुचनांनुसार मी व्हाईस रेकर्डरसह पंच क्र. 1 श्री. खरे यांच्यासोबत माझ्याकडील मोटारसायकलवर तसेच पोलीस निरीक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी, सापळा पथकातील कर्मचारी व पंच क्र. 02 श्री. थोरात असे शासकीय वाहनात बसुन 11.30 वा. रवाना झालो व चिंचोली लिंबाजी येथे आलो. तेथे माझी तसेच श्री. मगर, वनपाल अधिकारी यांची खंडोबा मंदिर भेट झाली. तेव्हा मी श्री. मगर, वनपाल अधिकारी यांना तुम्ही सांगीतल्याप्रमाणे 1,000/- रुपये आणले असे सांगीतले. तेव्हा त्यांनी सदरची लाच रक्कम त्यांच्या ऊजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पन्टचे ऊजव्या बाजुचे खिशात ठेवली. तेव्हा मी 11.37 वा. च्या सुमारास माझ्या डोक्याला बांधलेला रुमाल डाव्या हाताने सोडून हातात घेवून सापळा पथकास दिसेल असा प्रकारे इशारा केला. त्यानंतर तात्काळ सापळा पथकाने पंच क्र. 02 श्री. थोरात यांच्यासह घटनास्थळी दाखल होत श्री. मगर, वनपाल अधिकारी यांना पकडुन त्यांचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत केली. तेव्हा महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांनी त्यांचा परिचय करुन देत श्री. मगर, वनपाल अधिकारी यांना त्यांचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री. भगवान कौतीकराव मगर, वय 57 वर्षे, व्यवसाय नोकरी, वनपाल, सामाजिक वनिकरण विभाग, कन्नड जि. औरंगाबाद असे सांगीतले. त्यानंतर श्री. मगर, वनपाल यांच्या हातांची तसेच कपडयांची अल्ट्राव्हयेलेट लम्पच्या प्रकाशात तपासणी केली असता श्री. मगर, वनपाल अधिकारी यांच्या ऊजव्या हाताच्या पाचही बोटांचे पेऱ्यावर व तळहातावर ठिकठिकाणी तसेच पॅन्टच्या समोरील ऊजव्या बाजुच्या खिशाच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी ऍ्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच श्री. मगर, वनपाल अधिकारी यांच्या ताब्यातील लाचेच्या नोटा पंचांच्या समक्ष पडताळून पाहण्यात आल्या असता त्या सापळा कारवाईसाठी वापरण्यात आलेल्या नोटाच असल्याची खात्री झाली. तसेच सदर नोटांवर पंचांसमक्ष अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश टाकुन निरीक्षण केले असता त्यावर ऍ्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली आहे. त्यानंतर माझ्या हातांची तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताच्या बोटांचे पेऱ्यावर तसेच अंगातील पन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशाचे तोंडावर व आतमध्ये ठिकठिकाणी ऍ्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर महिला पोलीस निरिक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांनी श्री. मगर, वनपाल अधिकारी यांच्याकडे माझ्या शेतामध्ये महोगणी वृक्ष लागवडीसाठी केलल्या खर्चाचे व अनुदानाचे बील फाईल बाबत विचारले असता सदर बील हे ऑनलाईन असल्याचे श्री. मगर यांनी सांगीतले. त्यानंतर आम्ही सर्वजन श्री. मगर, वनपाल अधिकारी यांच्यासह सदर प्रकरणी उर्वरित कारवाई करण्याकरीता पोलीस स्टेशन पिशोर येथे आलो. तरी आज दिनांक 27/01/2021 रोजी दुपारी 11.37 वा. च्या सुमारास चिंचोली लिंबाजी येथे खंडोबा मंदिराजवळ श्री. भगवान कौतीकराव मगर, वय 57 वर्षे, व्यवसाय नोकरी, वनपाल, सामाजिक वनिकरण विभाग, कन्नड जि. औरंगाबाद रा. चिंचोली लिंबाजी सोनारगल्ली, पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद यांनी माझ्याकडे माझ्या शेतामध्ये महोगणी वृक्ष लागवडीसाठी केलल्या खर्चाचे व अनुदानाचे बील मंजुर करण्यासाठी 2,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 1,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले वरुन माझ्याकडून स्वीकारली म्हणून त्यांच्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.माझी फिर्याद माझ्या सांगण्याप्रमाणे टंकलिखीत संगणकावर टंकलिखीत केली असून मी वाचून पाहिली. ती बरोबर व खरी आहे.समक्ष हि फिर्याद दिली सही

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** Vijay Manikrao Aher
**Rank (पद):** SI (Sub-Inspector)
**No.(क्र.):** PSI **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**
**Name (नाव):** Balaji madanrao vaidya
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोलीस ठाणे अंमलदार
पो. स्टे. पिशोर